लोकमत

epaper.lokmat.com
पुणे, शुक्रवार, दि. १८ नोव्हेंबर २०२२

# राजगुरू महाविद्यालयाचे विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश

## मैदानी स्पर्धेत मुलीच्या संघाला विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा संकुलाच्या सिंथेटिक ट्रॅकवरती १३ ते १५ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या पुणे जिल्हा क्रीडा विभाग समितीअंतर्गत आंतरमहाविद्यालयीन मैदानी मुले व मुली स्पर्धांमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने विजेतेपद प्राप्त केले.

मुले व मुली या दोन्ही संघांनी ८ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्यपदकांची कमाई करून सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले.

संगीता शिंदे हिने ४०० मी. धावणे, ४०० मी. Hurdles, ८०० मी. ४ १०० रिले, ४x४०० रिले यात ३ वैयक्तिक व २ सांघिक सुवर्णपदके, ऐश्वर्या खळदकर हिने २१ किमी धावणेत सुवर्णपदक, १०००० मी. धावणेत रौप्य, ४ १०० रिले, ४x४०० रिलेत २ सांघिक सुवर्णपदके, अक्षय दरेकर याने भालाफेक, बांबूउडीत २ वैयक्तिक सुवर्णपदके, संदेश डांगले याने बांबूउडीत १ वैयक्तिक रौप्यपदक, जगदीश दरेकर याने भालाफेकीत १ वैयक्तिक कांस्यपदक, कोमल सावंत हिने ४०० मी. धावण्यात कांस्यपदक, ४x४०० रिलेत सांघिक सुवर्णपदक, रोहिणी पुंडगे याने लांबउडीत कांस्यपदक ४ १०० रिले व ४x४०० रिलेत २ सांघिक सुवर्णपदके आणि कांचन सावंत

हिने ४x१०० रिलेत सांघिक सुवर्णपदकाची कमाई केली.

या सर्व खेळाडूंची १७ ते १९ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या आंतरविभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंचे व क्रीडा संचालक प्रा. प्रतिमा लोणारी यांचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले आहे.